पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक - २६५**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - १४/०२/२०१७ वेळ - दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १४/०२/२०१७ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

याशिवाय मा.उल्हास जगताप-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संम्मतीने सोमवार दिनांक २७/०२/२०१७ रोजी सकाळी ११.४० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक - २६५**

**(सभावृत्तांत)**

**( दि.१४/०२/२०१७ ची तहकूब सभा)**

दिनांक - २७/०२/२०१७ वेळ - सकाळी ११.४० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि. १४.०२.२०१७ ची तहकूब सभा सोमवार दिनांक २७/०२/२०१७ रोजी सकाळी ११.४० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - **सभापती**
२) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
३) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
४) मा.नेटके सुमन राजेंद्र
५) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.गावडे - सहआयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.दुधेकर - सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दंडवते, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर, मा.लोणकर - सहा.आयुक्त, मा.साळूंके - मुख्य उदयान अधिक्षक, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.आवारी - प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.लडकत, मा.पाटील, मा.घुबे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

ठराव क्रमांक -२०७६५ विषय क्रमांक - १
दिनांक - २७/०२/२०१७ विभाग - वायसीएमएच
सूचक - मा.संपत पवार अनुमोदक - मा.अमिना पानसरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/भांडार/२/कावि/४५/२०१७ दि.३१/०१/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती पी.एम. सेंटर व डायलिसीस विभाग यांनी मागणी केलेनुसार फॉगर मशीन ०२ नग खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्रं.०६/२०१६-१७ अन्वये दरपत्रके मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त दरपत्रकांमध्ये मे.ऑस्टीन हेल्थ केअर, पुणे यांनी फॉगर मशीन ०२ नग खरेदी करणेकामी र.रु.२४,६००/- प्रती नग (सर्व करांसह) सादर केलेला दर लघुत्तम प्राप्त झाला असुन स्विकृत करणेत आला आहे. मे.ऑस्टीन

हेल्थ केअर, पुणे यांचेकडून यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या पीएम. सेंटर व डायलिसीस विभाग यांचेकरीता फॉगर मशीन ०२ नग र.रु.२४,६००/- प्रती नग(सर्व करांसह) प्रमाणे करारनामा न करता खरेदी करणेस व सदर फॉगर मशीन खरेदी करणेकामी होणा-या एकूण र.रु.४९,२००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास हजार दोनशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक -२०७६६ विषय क्रमांक - २

दिनांक - २७/०२/२०१७ विभाग - माहिती व तंत्रज्ञान

सूचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुमन नेटके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/५५/२०१६ दि.६/०२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

सन २०१६ चे बैंगलोर येथील दि.११ नोव्हेंबर २०१६ रोजी आयोजित केलेले Digital Citizen Summit करीता दि.११/११/२०१६ रोजी उपस्थित राहणेकामी श्री.निळकंठ पोमण, समन्वयक JNNURM तथा मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी स्वखर्चातून केलेल्या एकूण र.रू.७,२१७/- (अक्षरी रक्कम रूपये सात हजार दोनशे सतरा फक्त) ची प्रतिपुर्ती करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक -२०७६७ विषय क्रमांक - ३

दिनांक - २७/०२/२०१७ विभाग - निवडणूक

सूचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.संपत पवार

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/४२८/२०१७ दि.६/०२/२०१७

मा.सहा. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०१७ करिता मा. आयुक्त सो.यांचे अन्टीचेंबर मध्ये, उमेदवारी खर्च कक्षातील निवडणूकीचे कामकाजासाठी मा.मुलेप विभागासाठी व निवडणुक विभागासाठी आवश्यक Led Tv Screen साहित्य खरेदीकामी बाब क्र.०१ ते २ (Led Tv Screen (size 55”) व Led Tv Screen (size40”) साहित्य पुरवठा करणे कामी ऑनलाईन कोटेशन नो.क्र.४०/२०१६-१७ अन्वये मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन सिलबंद लिफाप्यात कोटेशनदर मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद लिफाप्यात तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.एस.एस.टेलिकॉम एंटरप्रायजेस, पुणे-०२ यांचे आवश्यक बाब क्र.१ ते २(एकूण ०४ नग) साहित्याचे र.रु.२,६१,०००/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाज पत्रकीय रक्कमे पेक्षा ०.८१% ने कमी आहे. मे.एस.एस.टेलिकॉम एंटरप्रायजेस यांचे आवश्यक एलईडी टिव्ही साहित्य खरेदी करणेकामी एकूण र.रु.२,६१,०००/-दर स्विकृत करण्यात

आले असून याकामी करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/६५२/२०१७
दिनांक - २७/०३/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.